पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:
(१) स्त्रीरोग तज्ञ - ०६ पदे, (२) बालरोग तज्ञ - ०७ पदे, (३) भुलतज्ञ - ०६ पदे, (४) फिजिशियन - ०६ पदे, (५) रेडिओलॉजिस्ट - ०१ पद, (६) नेत्ररोग तज्ञ - ०१ पद, (७) वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) - १२ पदे, (८) वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस.) - ०९ पदे, (९) निवासी वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस.) - १४ पदे, (१०) दंतशल्य चिकित्सक - ०३ पदे, (११) फार्मासिस्ट - ११ पदे, (१२) स्टाफनर्स - ३९ पदे, (१३) लॅब टेक्निशियन - ०५ पदे, (१४) एक्स रे टेक्निशियन - १ पद, (१५) सफाई सेवक (महिला) - २६ पदे भरावयाची आहेत.

वरीलप्रमाणे नमुद सवर्गातील पदे भरणेबाबतची सविस्तर जाहिरात, अर्हता, आरक्षणाचा तपशील, अटी शर्ती तसेच त्याअनुषंगाने इतर सर्व आवश्यक माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर असणाऱ्या "आमच्याविषयी" (About) मध्ये "नोकरीविषयक" (Recruitment) या सदरामध्ये उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी जाहिरात उपलब्ध करुन घ्यावी व विहित अर्जासह महापालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य मार्गाने उपलब्ध होणाऱ्या माहितीचे आधारे वैद्यकिय विभागामध्ये चौकशी करु नये.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्रमांक - ९८३
संकेतस्थळ - www.pcmcindia.gov.in
क्र. वैद्य/१/कावि/ ९० /२०२०
दि. ३ - ९ -२०२०

(डॉ. पवन साळवे)
अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

Scanned by CamScanner

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**वैद्यकीय विभाग मुख्य कार्यालय**
**पिंपरी, पुणे ४११ ०१८**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण तपशील व अटी - शर्ती खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | स्त्रीरोग तज्ञ | १) MBBS व M.D. (Obst. & Gynaecology) ही पदवी / D.G.O. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक. | ०६ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| २ | बालरोग तज्ञ | १) MBBS व M.D. (Paediatrics) ही पदवी / D.C.H. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक. | ०७ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजाभज ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| ३ | भुलतज्ञ | १) MBBS व M.D. (Anaesthesia) ही पदवी / D.A. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक | ०६ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| ४ | फिजिशियन | १) MBBS व M.D. (Medicine) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर ६ महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक | ०६ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| ५ | रेडिओलॉजिस्ट | १) MBBS व M.D. (Radiology) ही पदवी /D.M.R.D. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर ६ महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक | ०१ | खुला ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | नेत्ररोग तज्ञ | १) MBBS व M.S. (Ophthalmology) ही पदवी/ D.O.M.S. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक | ०१ | खुला ०१ |
| ७ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S. ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक. | १२ | अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजाभज ०१<br>इमाव ०२<br>ईएसबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०३ |
| ८ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबी एस / बीएएमएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S. / B.A.M.S. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक | ०९ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजाभज ०१<br>इमाव ०२<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०२ |
| ९ | निवासी वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील M.B.B.S. / B.A.M.S. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक. | १४ | अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>इमाव ०३<br>एसईबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०३ |
| १० | दंतशल्य चिकित्सक | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.D.S.ही पदवीउत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) Internship झालेनंतर 1 वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक<br>३) महाराष्ट्र स्टेट डेंटल कौन्सिल यांचेकडील नोंदणी बंधनकारक. | ०३ | अनु.जाती ०१<br>इमाव ०१<br>खुला ०१ |
| ११ | फार्मासिस्ट | १) शासनमान्य संस्थेकडील B.Pharm. ही पदवी / D.Pharm. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल यांचेकडील नोंदणी बंधनकारक<br>३) P.P.P. रजिस्ट्रेशन अद्यावत असणे आवश्यक<br>४) 6 महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक. | ११ | अनु.जाती ०१<br>अनु.जमाती ०१<br>विजाभज ०१<br>इमाव ०२<br>एसईबीसी ०२<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०३ |
| १२ | स्टाफनर्स | १) B.Sc. / M.sc. Nursing / B.P.N.A. / R.G.N.M.कोर्स पूर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक<br>३) 6 महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक. | ३९ | अनु.जाती ०५<br>अनु.जमाती ०३<br>विजा अ ०१<br>भज ब ०१<br>भज क ०१<br>भज ड ०१<br>विमाप्र ०१<br>इमाव ०७<br>एसईबीसी ०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ईडब्ल्युएस ०४<br>खुला १० |
| १३ | लॅब टेक्निशियन | १) B.Sc. पदवी व D.M.L.T. कोर्स पुर्ण असणे आवश्यक.<br>२) 6 महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक | ०५ | अनु.जाती ०१<br>इमाव ०१<br>एसईबीसी ०१<br>ईडब्ल्युएस ०१<br>खुला ०१ |
| १४ | एक्स रे टेक्निशियन | १) H.S.C. (Science) उत्तीर्ण व एक्स-रे टेक्निशियन कोर्स पुर्ण असणे आवश्यक<br>२) 6 महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक | ०१ | खुला ०१ |
| १५ | सफाई सेवक (महिला) | ४ वी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>(दवाखाना / रूग्णालयामधील शौचालय साफसफाईचे कामकाज, डिलीव्हरी वॉर्ड मधील रुग्णांना इनिमा देणे इ. कामकाज तसेच शिफ्ट नुसार कामकाम करणे बंधनकारक राहिल) | २६ | ----- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर तांत्रिक संवर्गातील पदांना शैक्षणिक अर्हता व त्यांचा अनुभव विचारात घेऊन खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल:

| **शैक्षणिक अर्हता** | **मानधन** |
|---|---|
| एम.बी.बी.एस | दरमहा र.रु. ५५०००/- |
| एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदविका | दरमहा र.रु. ६००००/- |
| एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदवी | दरमहा र.रु. ६५०००/- |
| बी.ए.एम.एस. | दरमहा र.रु. ३५०००/- |
| दंतशल्य चिकित्सक | दरमहा र.रु.४००००/- |
| निवासी वैद्यकीय अधिकारी MBBS<br>निवासी वैद्यकीय अधिकारी BAMS | दरमहा र.रु. ६००००/-<br>दरमहा र.रु. ४००००/- |
| अ.क्र. ११ ते १४ मधील नमूद पदे | दरमहा र. रु. २२४००/- |
| अ.क्र. १५ मधील नमूद पद | दरमहा र. रु. १९४००/- |

**टिप-**

१. प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

२. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३. उपरोक्त पदांकरीता उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडणेत आलेला आहे. अर्ज करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी / लेखी परीक्षेसाठी उपस्थित राहताना स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा १ फोटो, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती (उदा. गुणपत्रिका (मार्कशीट), सर्टिफिकेट, जातीचा दाखला तसेच मेडिकल कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी / नुतनीकरण प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे) सादर करणे बंधनकारक आहे.

४. अ.क्र. १ ते ६ मध्ये नमूद केलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांचे पदाकरीता MBBS ही पदवी धारण करणे आवश्यक असेल.

५. प्रस्तुतचे परीक्षेस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

६. निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच मनपाचे रुग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

७. वरील सर्व पदांना मागासवर्गीयांचे आरक्षण लागु राहील.

८. वय वर्षे ६० पूर्ण असणा-या उमेदवारांनी उपरोक्त नमूद पदांसाठी अर्ज करुन नयेत, असे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

९. सदर उमेदवारांना महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असणाऱ्या दवाखाना / रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल. तथापि, नेमून दिलेल्या दवाखाना / रुग्णालयामध्ये आवश्यकता नसलेस अन्य ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार अन्य रुग्णालये / दवाखान्यांमध्ये कामकाज करावे लागेल.

१०. सफाई सेवक या पदावरील महिला उमेदवारांना दवाखाना / रुग्णालयामध्ये शौचालय साफसफाईचे कामकाज करणे बंधनकारक राहील

११. <u>अ.क्र. १ ते १५ वरील पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी खालील तक्त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे मुलाखतीसाठी / लेखी परीक्षेसाठी उपस्थित रहावे. तसेच सदर उमेदवारांनी खालील वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांकास व वेळेत नाव नोंदणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज, मुळ कागदपत्रे व त्यांचे छायांकित (सत्य प्रती) प्रतींसह उपस्थित रहावे. नोंदणी करण्यात आलेल्या उमेदवारांनाच लेखी परिक्षेला / मुलाखतीला बसण्याची परवानगी देणेत येईल.</u>

| अ.क्र. | जाहिरातीतील पदाचे अनुक्रमांक | मुलाखतीचा / लेखी परीक्षेचा दिनांक | ठिकाण | अर्ज स्विकारणे व नाव नोंदणीची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अ.क्र. १ ते १० | १०-०१-२०१९ | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८ | सकाळी ९ ते ११ पर्यंत |
| २ | अ.क्र. ११, १३ व १४ | ११-०१-२०२० | पिं.चिं.म.न.पा.चे माध्यमिक विद्यालय, काळभोर नगर, चिंचवड, पुणे | |
| ३ | अ.क्र. १२ व १५ | १२-०१-२०२० | | |

१२. वरील तक्त्यामधील मुलाखतीचा / लेखी परीक्षेचा दिनांक व ठिकाण यामध्ये उमेदवारांचे उपलब्ध होणा-या संख्येनुसार बदल होऊ शकतो.

१३. प्रस्तुत जाहिरातीनुसार नोंदणीचे वेळी उमेवाराने सादर केलेले अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांचे आधारे संबंधित उमेदवारांना परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार आहे. तथापि उमेदवारांची निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कोणत्याही स्तरावर / कागदपत्रांच्या छाननीमध्ये उमेदवार पात्र नसल्याचे आढळून आल्यास, संबंधित उमेदवार निवडीकरीता / नियुक्तीकरीता अपात्र राहिल.

१४. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

१५. प्रस्तुतचे जाहिरातीकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहिरातीसोबत उपलब्ध करुन देणेत आलेला आहे. सदरचे अर्जासह उमेदवाराने निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. याकरीता महापालिकेमार्फत स्वतंत्रपणे अर्ज उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१६. अ.क्र. १ ते ६ मध्ये नमूद तज्ञ वैद्यकिय अधिकारी ही पदे मुलाखतीद्वारे भरणेत येथील. याकरीता महापालिकेने Marking Pattern विहीत केलेला असून त्यानुसारच गुण निश्चित केले जाणार आहेत.

त्यामध्ये संबंधित तज्ञ विषयाचे Registration झालेल्या दिनांकानंतरचा अनुभव ग्राह्य धरला जाणार असल्याने उमेदवाराने Registration प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७. अ. क्र. ७ ते १५ मध्ये नमूद पदांकरीता पर्याप्त उमेदवार (१ जागेकरीता ५ प्रमाणे) उपलब्ध न झाल्यास सदरची पदे मुलाखतीद्वारे भरणेत येथील. याकरीता टिप क्र. १६ मध्ये नमूद केलेनुसारच मुलाखतीची कार्यपध्दती राहिल.

१८. सदर नेमणूकीच्या अनुषंगाने गुणानुक्रम यादी तसेच अंतिम निवड यादी, नेमणूक आदेश महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जातील. ते संबधित उमेदवारांनी उपलब्ध करुन घेऊन मुदतीत वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ येथे रुजू व्हावयाचे आहे. याकरीता कोणत्याही उमेदवारास **स्वंतत्र पत्रव्यवहार अथवा दूरध्वनी / मोबाईल / sms** द्वारे संपर्क करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दि. १४/०१/२०१० चे शासन निर्णयानुसार पुनर्नियुक्ती न देणेबाबत निर्देश प्राप्त आहेत. त्यामुळे वरील जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांवर वैद्यकिय विभागाकडील आदेश क्र. वैद्य/१/कावि/११८५/२०१८,दि.०१-१०-२०१८ व तदनंतर वेळोवेळी Walk in Interview मध्ये मानधनावर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तथापि उमेदवारांना पुनर्नेमणूक देण्याचा / नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

क्र. वैद्य/१/कावि/ १० /२०२०
दि. 3 -०१-२०२०

(डॉ पवन साळवे)
**अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

Scanned by CamScanner

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

| फोटो |
|---|

**प्रति,**

**मा. आयुक्त.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय - करार/कंत्राटी/मानधन पध्दतीने भरावयाच्या ------------------------ या पदासाठी अर्ज**
**संदर्भ - वैद्यकिय विभागाकडील जाहिरात क्र. ------------ दि. - -२०**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालय / दवाखान्यामध्ये करार / कंत्राटी / मानधन पध्दतीने भरावयाच्या --------------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

| अ.क्र. | तपशील | माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | **नाव** | **आडनाव** | **वडील / पतीचे नाव** |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | |
| ३ | ई-मेल | | मोबाईल क्र. | |
| ४ | जन्मतारीख | | | |
| ५ | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | होय / नाही | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | पदनाम - | |
| ७ | जात - | | जातीचा प्रवर्ग - | |

| SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

८ शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| **शैक्षणिक अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | **मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| ९ | तांत्रिक व इतर अर्हता तपशील | |
|---|---|---|
| | | |

१० अनुभवाचा तपशील

| **अ.क्र.** | **संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक** | **पदनाम** | **कालावधी** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ६ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. तसेच सद्यस्थितीत मी या महापालिकेमध्ये मानधन स्वरुपात कार्यरत नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास या माहितीच्या आधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ -** **अर्जदाराची सही -**

**दि. / /२०** **अर्जदाराचे नाव --------------------------------------**

**सहपत्रे -** अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे २) अनुभवाची प्रमाणपत्रे ३) जात प्रमाणपत्र
४) अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) इतर कागदपत्रे.